# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.08.2025** **वारःरविवार**

---

**१. बेंगळुरूमधून ३ वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे गाड्यांना पंतप्रधान दाखवणार हिरवा झेंडा**

**२. ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची ६ विमानं पाडल्याची वायु दल प्रमुखांची माहिती**

**३. येत्या दोन ते तीन वर्षांत संरक्षण निर्यात दुप्पट होईल असा DRDO सचिवांचा विश्वास**

**४. ३३४ राजकीय पक्षांची मान्यता निवडणूक आयोगाकडून रद्द आणि**

**५. उत्तराखंडमधील भूस्खलन आणि पुरात अडकलेले महाराष्ट्रातील पर्यटक सुरक्षित**

**आता सविस्तर बातम्या**

**<u>पुणे-नागपूरवंदेभारत</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कर्नाटक दौऱ्यावर असून या दौऱ्यादरम्यान ते बेंगळुरूमधील केएसआर रेल्वे स्थानकावर तीन वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवतील. यामध्ये बेंगळुरू ते बेळगावी, अमृतसर ते श्री माता-वैष्णोदेवी कटरा आणि नागपूर (अजनी) ते पुणे या गाड्यांचा समावेश आहे. बेंगळुरू मेट्रोच्या यलो लाईनला हिरवा झेंडा दाखवून आरव्ही रोड, रागीगुड्डा ते इलेक्ट्रॉनिक सिटी मेट्रो स्थानकापर्यंत मेट्रो मधून पंतप्रधान प्रवास करतील. ते बेंगळुरूमध्ये शहरी दळणवळण प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी देखील करणार आहेत. ४४ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या ३१

उन्नत स्थानकांच्या १५ हजार ६१० कोटी रुपयांच्या बेंगळुरू मेट्रो फेज-३ प्रकल्पाची पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>पाकिस्तानीविमानं</u>**

ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडल्याचं भारतीय वायु दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी काल बेंगळुरू इथं सांगितलं. १६ व्या एअर चीफ एल. एम. कात्रे स्मृती व्याख्यानात ते बोलत होते. भारतानं पाडलेल्या विमानांमध्ये पाकिस्तानी हवाई दलाच्या पाच लढाऊ विमानांशिवाय अॅवॅक्स या सूचना आणि नियंत्रण म्हणजेच टेहळणी विमानाचाही समावेश असल्याचं वायु दल प्रमुखांनी सांगितलं. ही सर्व विमानं जवळपास तीनशे किलोमीटर अंतरावरून पाडण्यात आल्याचं सांगतानाच जमिनीवरून हवेत मारा करून विमानं पाडण्याचा हा उच्चांक ठरला असल्याचंही ते म्हणाले. भारताच्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचा शाहबाज जेकोकाबाद हवाई तळ उद्ध्वस्त झाला, त्यामध्ये F16 सारख्या काही विमानांचंही नुकसान झाल्याचं सिंग यांनी नमूद केलं.

**<u>संरक्षणनिर्यात</u>**

देशातून गेल्या वर्षी २३ हजार कोटी रुपये इतकी संरक्षण निर्यात झाली, येत्या दोन ते तीन वर्षांत ती दुप्पट होईल असा विश्वास संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे DRDO चे सचिव आणि DIAT च्या शिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत व्यक्त केला. पुण्याच्या डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी DIAT चा १४ वा पदवीदान समारंभ कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. भारतीय संरक्षण सामग्रीला मध्य पूर्वेकडील देश, आफ्रिका आणि दक्षिण आशियाई देशांमधून मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचं त्यांनी सांगितलं. ब्रह्मोस क्षेपणास्त्राची छोटेखानी आवृत्ती विकसित करण्याचं काम प्रगतीपथावर असून झोरावर हा वजनाने हलका रणगाडाही वेगानं विकसित होत आहे. ऑपरेशन सिंदूर राबवताना भारतीय सैन्य दलांना डीआरडीओनं विकसित केलेल्या शस्त्रास्त्रांची, उपकरणाची लक्षणीय मदत झाल्याचंही ते म्हणाले .

**<u>निवडणूकआयोग</u>**

विविध निकष पूर्ण न करू शकलेल्या ३३४ पक्षांची मान्यता निवडणूक आयोगानं काल रद्द केली आहे. गेल्या सहा वर्षांमध्ये ज्या पक्षांनी एकही निवडणूक लढवलेली नाही आणि ज्यांच्या कागदपत्रात दिलेल्या पत्त्यांवर त्यांची कार्यालयं आढळून आली नाहीत, अशा पक्षांची मान्यता निवडणूक आयोगानं

काढून घेतली. त्यामुळे आता देशात २ हजार ५२० नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्ष राहिले असून ६ राष्ट्रीय आणि ६७ प्रादेशिक पक्ष आहेत निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. ३३४ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये देखील प्रत्यक्षरित्या कुठेही स्थित नाहीत. हे पक्ष देशभरातील विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील आहेत.

**हरघरतिरंगा**

सिक्कीम सरकारने घरोघरी तिरंगा उपक्रम संपूर्ण उत्साहात साजरा करण्यासाठी व्यापक पावलं उचलली असून नागरिकांना एक लाख राष्ट्रध्वज वाटले जाणार आहेत . १२ ऑगस्ट रोजी राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत गंगटोकमधील एमजी मार्ग इथून तिरंगा रॅली काढण्यात येईल. त्यानंतर मनन केंद्रात सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध विषयांवर प्रदर्शनही भरवलं जाणार आहे .

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**बांग्लादेश**

बांगलादेशच्या १३ व्या राष्ट्रीय संसद निवडणुका पुढील वर्षी फेब्रुवारीच्या पहिल्या सहामाहीत होतील असं बांगलादेशचे मुख्य निवडणूक आयुक्त ए एमएम नासिर उद्दीन यांनी म्हटलं आहे. , निवडणुकीच्या दोन महिने आधी म्हणजे डिसेंबरच्या सुरुवातीला वेळापत्रक जाहीर केलं जाईल .

**रशिया**

१५ ऑगस्ट रोजी अलास्का इथे होणाऱ्या बैठकीसाठी अमेरिका आणि रशियन फेडरेशनमध्ये झालेल्या सामंजस्य कराराचं भारतानं स्वागत केलं आहे. ही बैठक युक्रेनमध्ये सुरू असलेला संघर्ष संपवण्याचं आणि शांततेचे मार्ग खुले करण्यासाठीचं पाउल असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा युद्धाचा काळ नाही असं वारंवार स्पष्ट केलं आहे.

**जागतिकसिंहदिन**

आज जगभरात जागतिक सिंह दिन साजरा केला जात आहे. सिंहाच्या परिसंस्थेतील भूमिकेबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी सिंहांच्या संख्येचं संरक्षण आणि जतन करण्याच्या अनुषंगाने आजचा दिवस पाळला जातो. या पार्श्वभूमीवर गुजरात राज्य, आशियाई सिंह संवर्धनात, एक महत्त्वाचा टप्पा गाठत आहे. २०२५ च्या गुजरातमधील सिंहगणनेत ८९१ सिंहांची

ऐतिहासिक नोंद झाली असून सिंहांच्या संवर्धनात बरडा अभयारण्य गिर अभयारण्यापेक्षा पुढे आहे. पोरबंदरजवळील बरडा अभयारण्यात १७ सिंह आणि २५ बिबटे नोंदवण्यात आले आहेत.

**<u>लखपतीदीदी</u>**

महिला सक्षमीकरणाच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून राज्यात एक कोटी "लखपती दीदी" तयार करण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुलुंड इथल्या रक्षाबंधन उत्सवात ते काल बोलत होते. गेल्या वर्षी लखपती दीदींची संख्या २५ लाख होती तर यावर्षीही आणखी २५ लाख दीदी निर्माण करण्याचा मानस असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीने सत्ता राखल्याबद्दल महिलांच्या पाठिंब्याला श्रेय देत, मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की भावांनी त्यांच्या बहिणींना सक्षम करण्याचा संकल्प करावा जेणेकरून त्या स्वतःचं आणि त्यांच्या कुटुंबाचं रक्षण करू शकतील.

**<u>बुद्धिबळ</u>**

जागतिक क्रमवारीत ५ व्या क्रमांकावर असलेल्या भारतीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगाईसीच्या दमदार कामगिरीमुळे त्याने काल क्वांटबॉक्स चेन्नई ग्रँड मास्टर्स स्पर्धेच्या तीन फेऱ्यांनंतर अमेरिकन ग्रँडमास्टर - रे रॉबसनला पराभूत केलं आणि जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरनंतर दुसरं स्थान कायम ठेवलं . मास्टर्स श्रेणीतील राउंड-रॉबिन स्पर्धेत आणखी सहा फेऱ्या शिल्लक असताना, एरिगाईसी २.५ गुणांसह आघाडीवर आहे, तर कीमरने - कार्तिकेयन मुरलीविरुद्ध शास्त्रीय बुद्धिबळ स्पर्धेत आणखी एक विजय मिळवल्यानंतर तीन गुणांसह आघाडी घेतली आहे.

**<u>रग्बी</u>**

बिहारमधील राजगीर इथे सुरु असलेल्या आशिया रग्बी अंडर-२० चॅम्पियनशिप सेव्हन्समध्ये भारतीय महिला संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उपांत्य फेरीत धडक मारली. पहिल्या सामन्यात कझाकस्तानला हरवल्यानंतर भारतीय महिला संघाने दुसऱ्या सामन्यात यूएई संघाचा पराभव केला. या निकालामुळे हाँगकाँग चीनविरुद्धच्या उपांत्य फेरीत भारताचा प्रवेश निश्चित झाला.

**<u>नागासाकी</u>**

जपानमधील नागासाकी इथे झालेल्या अणुबॉम्ब हल्ल्याच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त काल जपानमध्ये प्रार्थना सभा झाल्या. सध्याच्या जागतिक संघर्षांमुळे जग पुन्हा अणुयुद्धाकडे ढकलले जाऊ शकण्याचा इशारा नागासाकीच्या महापौरांनी यावेळी दिला. ९ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने

नागासाकीवर १०हजार पौंड वजनाचा प्लुटोनियम-२३९ बॉम्ब टाकला आणि संपूर्ण नागासाकी शहर उद्ध्वस्त झालं आणि २ लाख पैकी २७ हजार लोकांचा तात्काळ मृत्यू झाला होता . १९४५ च्या अखेरीस, तीव्र किरणोत्सर्गाच्या संपर्कात येऊन मृतांची संख्या ७० हजारांपर्यंत पोहोचली. अमेरिकेच्या युरेनियम-२३५ बॉम्बने हिरोशिमा नष्ट केल्यानंतर तीन दिवसांनी नागासाकीचा नाश झाला. दुसरं महायुद्ध संपल्यानंतर १५ ऑगस्ट रोजी जपानने आत्मसमर्पण केलं होतं.

**पर्यटक**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली भागात झालेल्या भूस्खलन आणि पुरात अडकलेल्या महाराष्ट्रातील १७२ पर्यटकांपैकी १७१ पर्यटक उत्तराखंडमध्ये सुरक्षित असून एका बेपत्ता पर्यटकाचा शोध सुरू आहे. राज्य आपत्कालीन कृती दलाने दिलेल्या माहितीनुसार मते, माटली, जॉली ग्रँट आणि उत्तरकाशीसारख्या ठिकाणी १६० पर्यटक सुरक्षित आहेत. त्यापैकी अनेकांनी त्यांच्या मूळ प्रवास कार्यक्रमानुसार प्रवास पुन्हा सुरू केला आहे. हर्सिलमध्ये अडकलेले अकरा पर्यटक देखील सुरक्षित आहेत.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने पुढील ७ दिवसांत उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. पुढील ६-७ दिवसांत उप-हिमालयी पश्चिम बंगाल, आसाम, सिक्कीम, बिहार, मेघालय आणि अरुणाचल प्रदेशातही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली आहे.

आज आंध्र प्रदेश, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, पंजाब, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि पश्चिम मध्य प्रदेशात मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं ,**

**नमस्कार.**